Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0019

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# किनवट तालुक्यातील आदिवासी समाजाच्या समस्या

**रामदास पा. वागदकर**
संशोधक विद्यार्थी
एम.ए. ( अर्थशास्त्र ) बी. एड्. SET
सामाजिक शास्त्रे संकुल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड
ramdaswagadkar1993@gmail.com
मो. नं. 7263078129

**प्रा. डॉ. एम. एन. बिरादार**
अर्थशास्त्र विभाग
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,
भोकर ता. भोकार जि. नांदेड
drmadhavbiradar65@gmail.com
मो.नं. 8208679653

**सारांश** - आदिवासींना देशाचे खरे मालक, मुळ निवासी, धरतीची लेकरे अशा अनेक संज्ञानी संबोधिले जाते. हा समाज पुर्वी डोंगर दऱ्यात राहत असल्यामुळे त्यांचा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकास झालेला नाही. आदिवासींच्या विकासासाठी शासन विविध योजना राबवित असले तरीपण बोलीभाषा, उदासीनता, योग्य माहितीचा अभाव यामुळे त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. तरी शासन आश्रम शाळा, शिष्यवृत्ती, वस्तीगृहे, तसेच विविध प्रकल्पांतर्गत आदिवासी मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याचा प्रयत्न करत आहे. असे असले तरी त्यांना गरिबी, दारिद्र्य, व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा, कुपोषण, अंधश्रद्धा, निरक्षरता यासारख्या विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.

**मुख्य शब्द -** आदिवासी, सामाजिक, योजना

**प्रस्तावना**

जगातील सर्वच देशांमध्ये आदिवासी जमाती आहेत. विभिन्न देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावांनी संबोधल्या जाते. उदा. अमेरिकेत त्यांना रेड इंडियन्स (Red Indians), ऑस्ट्रेलियात एबोरिजिंस (Aborigines) आणि युरोप खंडातील देशांमध्ये जिप्सी (Gypsy ) या नावाने संबोधिले जाते. आफ्रिका खंडामधील देशांमध्ये आदिवासीच्या समूहाला Tribes म्हणजे जमात या नावाने संबोधल्या जाते. आजही आफ्रिका, आशिया आणि अमेरिका खंडामधील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर आदिवासी जमाती आहेत. युरोप खंडातील देशांमध्ये त्यांचे फार झपाट्याने आधुनिकीकरण झाले आहे व होत आहे. त्यामुळे तेथे जमात म्हणून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व ओळखणे कठीणप्राय झाले आहे. संख्यात्मक दृष्ट्या सर्वात जास्त आदिवासी जमाती आफ्रिका खंडानंतर केवळ भारतातच आहेत.

भारतात आदिवासी जमाती मोठया संख्येने राहत असून त्या भारतभर पसरलेले आहेत. भारतीय राज्यघटनेनुसार भारतात 645 आदिवासी जमाती (Schedule Tribes) असून 2011 च्या

जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या 10.43 कोटी इतकी आहे. आदिवासी लोकसंख्येचे भारतीय लोकसंख्येशी प्रमाण 8. 6 टक्के इतकी आहे. भारतात सर्वात जास्त भिल्ल आदिवासी जमातीची लोकसंख्या असून तिचे आदिवासी लोकसंख्येशी प्रमाण साधारणता 38 टक्के आहे. भारतातील मध्यप्रदेश या राज्यात सर्वात जास्त आदिवासी लोक राहत असून दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर ओरिसा आणि महाराष्ट्र ही राज्य आहेत.

महाराष्ट्रातील भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम, कातकरी, माडीया गोंड या 3 तीन आदिम जमाती (Primitive Tribes) म्हणून केंद्रशासनाने अधिसूचित केलेले आहेत. नांदेड जिल्ह्यातील किनवट हा आदिवासी समाजाची लोकसंख्या जास्त असलेला तालुका असून तो महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सीमेवर वसलेला आहे. या तालुक्यात गोंड, पारधी, भिल्ल, कोलाम, कोमा, फासेपारधी या जमातीचे तांडे आणि खेडी मोठ्या प्रमाणात आढळतात. 2011 च्या जनगणनेनुसार किनवट तालुक्याची लोकसंख्या 2,47,786 एवढी आहे. त्यातील 2,07,732 लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असून शहरी भागात 40,054 एवढी लोकसंख्या वास्तव्य करते. आदिवासी समाजाच्या बाबतीत पाहता किनवट तालुक्यातील एकूण आदिवासी लोकसंख्या 71, 896 असून त्यातील ग्रामीण भागात 68, 371 वास्तव्य करतात तर शहरी भागात 3, 525 एवढे अत्यल्प लोक वास्तव्य करतात.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

- आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
- आदिवासी समाजाच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.
- आदिवासी समाजाच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास करणे.
- आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर असणाऱ्या उपयोजनांचे अध्यान करणे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनसामग्रीवर भर देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने संदर्भग्रंथ, दैनंदिन वर्तमानपत्रातील लेख, मासिके आणि इंटरनेट इत्यादी वरून मिळणारी माहिती संकलित करून वापरण्यात आली आहे.

**आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्या-**

किनवट तालुक्यातील आदिवासी जमाती या डोंगर-दऱ्यात, रानावनात, जंगलात वास्तव्य करीत असताना आढळुन येतात. लाजऱ्या, बुजऱ्या, अनोळखी माणसाची न बोलणाऱ्या

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0019

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

आदिवासी पुढे अनेक समस्या असून यातील प्रमुख समस्या म्हणजे आर्थिक मागासलेपण होय. दारिद्र्यातून पुन्हा दारिद्र्याकडे अशा दुष्टचक्रात आदिवासी अडकलेला दिसून येतो. आदिवासी समाजाला भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या पुढील प्रमाणे.

1) **दारिद्रय-**

किनवट तालुक्यातील बहुसंख्य आदिवासी जमाती या दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. व्यवसायाने शेती करणाऱ्या आदिवासींची जमीन वन आणि पर्वत्तीय भागात असून ती फारशी सुपीक नाही. तसेच ती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून आदिवासीच्या जीवनावश्यक गरजही पूर्ण होत नाहीत. त्यामुळे आदिवासींमध्ये दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे.

2) **बेरोजगारी-**

आदिवासी समाजामध्ये बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे. कारण इतर समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजाकडे उपजीविका करणाऱ्या साधनाचा अभाव आहे. रोजगार संधी अभावी आदिवासी समाजाचा आर्थिक विकास योग्य गतीने होत नाही. त्यामुळे बेरोजगारीच्या समस्येतून कसे बाहेर पडावे हे आदिवासी समाजातील युवकांपुढील मोठा प्रश्न आहे.

3) **कर्जबाजारीपणा-**

दारिद्र्याच्या दृष्टचक्रात सापडलेल्या आदिवासींना आपल्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी खाजगी सावकारांकडून जास्त व्याजदराने कर्ज घेण्याशिवाय पर्याय नसतो. कर्ज फेडण्यासाठी आदिवासींना सावकाराकडे आपली शेती गहाण ठेवावी लागते. तसेच बरेचदा सावकारांच्या शेतीवर कामही करावे लागते. यातून आदिवासींच्या कर्जबाजारीपणात वाढच होताना दिसून येते. कर्जबाजारीपणाच्या चक्रातून कसे बाहेर पडावे ही आदिवासी समाजापुढील महत्त्वाची समस्या आहे.

4) **निरक्षरता-**

किनवट तालुक्यातील आदिवासी समाजामध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. कारण घरापासून आणि गावापासून लांब अंतरावर असणाऱ्या शाळांमध्ये मुलांना पाठविणे दारिद्र्यजन्य स्थितीत जीवन जगणाऱ्या आदिवासी पालकांना शक्य होत नाही. त्यामुळे आदिवासींचा विकास होण्यास अडथळा ठरणारी निरक्षरता ही समस्या आहे.

5) **भांडवलाचा अभाव-**

किनवट तालुक्यातील आदिवासी शेती व्यवसाय करतात. शेती व्यवसायामध्ये वापरले जाणारे तंत्रज्ञान अत्यंत निकृष्ट स्वरूपाचे असल्यामुळे या व्यवसायात शारीरिक कष्ट खूप केल्यानंतर मिळणारे उत्पन्न अत्यल्प असते. त्यामुळे या व्यवसायाला कंटाळून ज्या आदिवासी व्यक्ती इतर व्यवसाय करू इच्छितात त्या व्यक्तीकडे भांडवलाचा अभाव असल्याचे आढळुन येते.

**आदिवासी समाजाच्या सामाजिक समस्या-**

आदिवासी समाजाला देशाचे खरे मालक, मूळनिवासी, गिरीजन अशा अनेक संज्ञांनी संबोधले गेले असले तरीही त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. आदिवासींना त्यांच्या जन्मापासून विविध समस्यांना तोंड द्यावे लागत असुन त्यांच्या समोरील काही सामाजिक समस्या पुढील प्रमाणे.

1) **व्यसनाधीनता-**

आदिवासी समाजात व्यसनाधीनता खोलवर रुजलेली दिसून येते. कारण मद्यनिर्मिती करणे हा त्यांचा पारंपरिक व्यवसाय आहे. व्यसनाधीनतेमुळे आदिवासी दारिद्र्याच्या दृष्ट चक्रात सापडलेला आहे. अशा व्यसनाधिनतेच्या समस्येतून आदिवासींना बाहेर काढणे हे मोठे आव्हान आहे.

2) **कुटुंबाचा आकार-**

आदिवासी समाजामध्ये कुटुंब नियोजनासंबंधी अपेक्षित जनजागृती झाली नसल्याकारणामुळे कुटुंबाचा आकार मोठा आहे. त्यामुळेच कुटुंबामधील सर्वच मुलांच्या सर्व गरजा पूर्ण करणे शक्य नसते. कुटुंबाचा आकार मोठा असल्याकारणामुळे आदिवासींचा सर्वांगीण विकास होण्यास अडचणी निर्माण होतात.

3) **अंधश्रद्धेचा प्रभाव-**

आदिवासी समाजाची संस्कृती ही प्राचीन संस्कृती या नावाने ओळखली जात असून पारंपारिकता आदिवासी समाजाच्या जीवनशैलीचा भाग आहे. त्याचबरोबर देवी, गोवर, कावीळ, सर्दी ,खोकला, ताप हे रोग भागताच्या सल्ल्याने बरे होतात असी चुकीची समजुत आदिवासी समाजात प्रचलित आहे. आदिवासींच्या सामाजिक विकासाची गती कमी असण्यात अंधश्रद्धेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे.

4) **राहणीमानाचा निम्नस्तर-**

आदिवासी समाजाची तुलना इतर प्रगत समाजाबरोबर केल्यास असे दिसून येते की त्यांच्या राहणीमानाचा दर्जा खलावलेला आहे. राहणीमानाच्या निम्नस्तरामुळे आदिवासींच्या जीवनावश्यक गरजा देखील पूर्ण होत नसून व्यसनाधीनता, कुपोषण, अंधश्रद्धा दारिद्र्य या समस्याही निर्माण होताना दिसून येतात.

**5) शोषण-**

आदिवासी समाजाच्या अज्ञानाचा, भोळेपणा तसेच प्रामाणिकपणाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण केले जाते. व्यापारी, दलाल, ठेकेदार त्यांना फसवून त्यांची आर्थिक पिळवणूक करताना दिसून येतात. आदिवासींचे आर्थिक शोषण करणाऱ्यांनी त्यांचे जीवन हे पूर्वीपेक्षाही कठीण करून टाकलेले आहे.

**आदिवासी समाजाच्या आरोग्य विषयक समस्या-**

आदिवासी समाजाच्या आरोग्य विषयक समस्यांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**1) कुपोषणाची समस्या-**

आदिवासी समाजात केवळ लहान मुले कुपोषित असतात असे नाही तर प्रौढ पुरुष आणि स्त्रियांमध्ये आवश्यक त्या घटकांचा व पुरेसा अन्नाचा अभाव दिसून येत असल्यामुळे ते कुपोषित असतात. ते ज्या भागात राहतात त्या भागात विकणारे एकच अन्नधान्य खाल्ल्यामुळे कुपोषणाचे शिकार ठरतात. त्यामुळे आदिवासींचा विकास होत नाही. कुपोषणाची समस्या सोडविण्याचे आदिवासी समाजापुढे मोठे आव्हान आहे.

**2) अस्वच्छ राहणीमान-**

आदिवासी समाज ज्या भागात वास्तव्यासाठी आहे त्या भागात पिण्याच्या पाण्याचा अभाव असल्यामुळे आंघोळीसाठी व कपडे धुण्यासाठी आवश्यक पाणी मिळणे अशक्यच आहे. या व्यतिरिक्त त्यांना ओले कपडे वापरावे लागत असल्यामुळे न्युमोनिया सारख्या रोगांचा प्रादुर्भाव होतो. आदिवासींचे अस्वच्छ राहणीमान अनेक रोगांना आमंत्रण देते.

**3) वैद्यकीय सोयीचा अभाव-**

आदिवासी क्षेत्रात डॉक्टर, नर्स, आरोग्य केंद्र यांचा मोठ्या प्रमाणावर अभाव असल्यामुळे साथीच्या रोगाच्या काळात त्यांची अवस्था अत्यंत दयनीय अशी होते. वैद्यकीय सुविधांचा आदिवासी भागात विस्तार होत नाही. वैद्यकीय सोयींच्या अभावातुन आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या वृध्दींगत होत आहेत.

**4) पिण्याच्या पाण्याचा आभाव-**

आदिवासी लोक जंगल, दऱ्या-खोऱ्यात, रानावनात, डोंगराळ भागात राहत असल्यामुळे त्यांना नदी, नाले, तले, डबके, इ. ठिकांणावरील पाणी पिण्याचे पाणी म्हणून वापरवे लागते. पिण्यायोग्य पाण्याचा अभाव असल्यामुळे त्यांना अस्वच्छ, दूषित असे पाणी पिण्यासाठी वापरावे लागते त्यातून त्यांना कॉलरा, मलेरिया, डायरिया, टायफाईड यासारखे रोग होतात.

**5) दैववादी वृत्ती-**

सर्वच आदिवासी जमाती या पारंपारिक रुढी परंपरावर विश्वास ठेवणाऱ्या असल्यामुळे त्यांच्या दैववादी वृत्ती दिसून येते. आरोग्याची संबंधीत कोणत्याही समस्या असल्या तरी अपेक्षित असे औषध उपचार घेतले जात नसल्यामुळे बालमृत्यू, मातामृत्यू, विविध रोगांचा प्रादुर्भाव होत असल्याचे आढळून येते. आदिवासी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना करून देववादी वृत्ती नाहीशी करण्याची गरज आहे.

**उपाययोजना**

किनवट तालुक्यातील आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता पुढील उपाय योजना करणे आवश्यक वाटते.

- किनवट तालुक्यातील आदिवासी समाजासाठी ज्या शासकीय योजना आहेत. त्या योजनाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न करणे.
- आदिवासी समाजासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती आदिवासी पर्यंत पोहोचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.
- आदिवासी समाजातील मुले शिक्षण घेत असले तरी त्यांच्यात मध्येच शिक्षण सोडण्याचे प्रमाण जास्त आहे. म्हणून शिक्षणातील गळतीचे कारणे शोधुन उपाययोजना करणे.
- आदिवासी समाजातील अंधश्रद्धा, वाईट रुढी, परंपरा कमी करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम राबविणे.
- स्थानिक आदिवासींना रोजगाराच्या संधी देऊन त्यांचा सामाजिक तसेच आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न करणे.
- किनवट तालुक्यातील दुर्गम भागात वैद्यकीय सोयी सुविधा पुरविणे.
- आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आदिवासी कार्यकर्ते, सामाजिक संघटना, संशोधक इ. च्या माध्यमातून प्रयत्न करणे.

**समारोप-**

किनवट तालुक्यातील बहुसंख्य आदिवासी लोक हे दऱ्या-खोऱ्यात तसेच रानावनात वास्तव्य करतात. शहरी भागापासून दूरवर असणाऱ्या या लोकांना दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षता, कुपोषण, व्यसनाधीनता यासारख्या एक नाहीतर अनेक समस्यांनी ग्रासले आहे. या आदिवासींच्या विकासासाठी शासन विविध योजना राबवते मात्र त्या योजनाची अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसून येत नाही. तसेच शासनाने आदिवासींसाठी राबविलेल्या अनेक योजना कागदावरच असून आदिवासींचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास व्हायला पाहिजे तेवढा झालेला दिसून येत नाही. आदिवासी समाजासाठी असणाऱ्या योजनाची माहिती सर्वांपर्यंत पोहोचत नाही त्यामुळे या योजनांचा लाभ ठराविक लोक येताना दिसून येतात. आदिवासी समाजामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिक आहे. तसेच कर्जबाजारीपणाच्या संदर्भात तर असे म्हणता येते की, प्रस्तुतीच्या खर्चासाठी काढलेल्या कर्जाचा भार घेऊनच आदिवासी मुल जन्माला येते. कर्जाचा भार घेऊनच लहानाचे मोठे होते आणि मृत्यूनंतरच्या विधीसाठी देखील काढलेल्या कर्जाचा भार आपल्या वारसदारांवर सोपवून निघून जाते.

**संदर्भ-**


1) प्रा. रा. ज. लोटे - 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' पिंगळापुरे अॅण्ड कं. पब्लीशर्स, नागपूर, (2010).
2) डॉ. प्रदीप आगलावे - 'सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, (2020)
3) डॉ. सौ. शैलजा देवगावकर, डॉ. एस. जी. देवगावकर - 'आदिवासी विश्व' आनंद प्रकाशन,नागपूर, (2001).
4) प्रा. डॉ. टि. ए. मोरे - आदिवासींचे आर्थिक आणि सामाजिक प्रश्न- Electronic International Interdisciplinary Research Journal, Volume-VII, Issue-II, 2018.
5) प्रा. गुरुनाथ द. नाडगोंडे - 'भारतीय आदिवासी' कॉनटिनेन्टल प्रकाशन, पुणे, (2012).
6) डॉ. शौनक कुलकर्णी - 'महाराष्ट्रातील आदिवासी' डायमंड पब्लिकेशन्स,पुणे, (2009)
7) www.wikipedia.com